दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –९८ शनिवार,दि.१४ डिसेंबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-98 Saturday, Dt.14 December 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

उड्डाणपुलावरील जीवघेणे खड्डे जैसे की तैसे

चौपदरीकरणाचे काम प्रलंबित

परळी / अनुप कुसुमकर

परळी शहरातील रेल्वे उड्डाणपुलावरील जीवघेणे खड्डे जैसे की तैसे बनले असून शासन आपल्या दारी, लाडकी बहीण योजना अशा अनेक मोठ्या कार्यक्रम प्रसंगी शहरात सरकार दरबारी असलेले मंत्री महोदय आल्याने थातुरमातुर केलेली डागडुजी पुन्हा उघडली पडली आहे.दररोज हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या उड्डाणपुलावरील या जीवघेणा खड्ड्यामुळे अनेक अपघात घडले असून काही अपघातात वाहनधारकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

परळी शहरातील रेल्वे उड्डाण पुलावर

नेहमीच वाहनांची वर्दळ असते. आंबेजोगाई, लातूर व गंगाखेड, नांदेड, बीडकडे जाण्या येण्यासाठी शहरातून रस्ता जातो. येथे औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र, सिमेंट फॅक्टरी असल्याने तसेच रेल्वेने आलेल्या मालाचीही वाहतूक मोठ्या प्रमाणावर असते. ही सर्व वाहतूक शामप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपुलावरून होते.औष्णिक वीज निर्मिती केंद्र वसाहती मध्ये असलेल्या शाळेत अनेक लहान-मोठी वाहने शाळकरी मुलांना ने-आन करण्यासाठी याच पुलावरून धावतात. उड्डाणपूलावरील छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) च्या दिशेला मोठमोठी अपघात

१०० कोटींचा निधी कुठं गेला?..

शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या शामप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपुलासह आणखी एका रेल्वे उड्डाणपुलाच्या प्रश्नी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत रेल्वे उड्डाणपुलाचे चौपदरीकरण करण्याची मागणी केली होती. त्यांनी ही मागणी मंजूर करत शहरातील दोन्ही रेल्वे उड्डाणपुलाच्या चौपदरीकरणाचे काम सन २०२२ मध्ये मंजूर करून घेतले याकामी १०० कोटींचा निधी आला होता. यास दोन वर्षे पूर्ण होत असूनही अद्याप कामाला सुरवात झालेली नाही. आता मंजूर रेल्वे उड्डाणपुलांचे चौपदरीकरण कधी होणार असा प्रश्न परळीकरांना निर्माण झाला आहे.

प्रवण खड्डे निर्माण झाली आहेत.अनेकवेळा या खड्ड्याना चुकविण्याच्या प्रयत्नात अपघात देखील घडले आहेत.तीन महिन्यांपूर्वी हेच खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात मोटार सायकल आणि मालवाहू कंटेनर समोरासमोर धडक मोटारसायकल वर असलेला व्यक्ती कंटेनर खाली आल्याने जागीच ठार झाला तर सोबत असलेला एक व्यक्ती गंभीर जखमी झाला होता.

शहरात कुठलाही मोठा शासकीय प्रसंग अथवा मंत्री महोदय याचा दौरा असला की या खड्ड्याची डागडुजी करण्यात येते मात्र काही काळ लोटताच उड्डाणपूलाची अवस्था जैसे की तैसे असते.असा परिस्थितीत मंत्री महोदय परत परळीत या किमान या कारणाने तरी खड्डे दुरुस्ती होईल अशी मानसिकता परळीकरांची बनली आहे.

काम तत्काळ होणे गरजेचे...

शामप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलावर होणाऱ्या वाहतूक कोंडी आणि खड्ड्यामुळे अनेक अपघात झाले असून, अनेक प्रवाशांचा बळी गेलेला आहे. तसेच याच उड्डाणपुलावरून शहरातील सर्वात जास्त संख्या असलेल्या तीन ते चार शाळा आहेत. या शाळेत शहरातील पहिली ते बारावीपर्यंत विद्यार्थी मोठ्या संख्येने आहेत. या विद्यार्थ्यांची वाहतूक याच पुलावरून होते. यामुळे ही उड्डाणपुलाची दुरुस्ती आणि चौपदरीकरण होणे आवश्यक आहे.

आ.संदीप क्षीरसागरांचे रॅली काढून बंद पाळण्याचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येचा व सत्ताधारी आणि प्रशासनाकडून आरोपींना पाठीशी घालण्याच्या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी शुक्रवारी (दि.१३) रोजी बीड जिल्ह्यात बंद पुकारण्यात आला होता. या बंदला जिल्ह्यात सर्वत्र प्रतिसाद मिळाला. बीडमध्ये शुक्रवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. तसेच बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी रॅली काढून बीडमध्ये बंद पाळण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बीडमध्ये व्यापारी व नागरिकांनी कडकडीत बंद

स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शोधून कडक शासन करा

वाल्मिक कराड यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घ्या; परळीत महायुतीच्या वतीने पोलीस प्रशासनास निवेदन

परळी ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करावे तसेच त्यांच्यावर जलद गती न्यायालयात खटला चालवून त्यांना कठोरात कठोर शासन करावे; त्याचबरोबर परळीचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मिक कराड यांच्यावर राजकीय अकसातून लावण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आज परळी महायुतीच्या वतीने पोलीस प्रशासनास निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज परळी शहर पोलीस ठाण्यात याबाबतचे निवेदन सादर केले आहे.

केज तालुक्यातील स्व.संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या ही मानवतेला काळिमा फासणारी आहे, या दुर्दैवी घटनेतील उर्वरित आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यात यावे, तसेच ज्येष्ठ नेते वाल्मिक कराड यांच्यावर अवादा एनर्जी कंपनीच्या माध्यामातून राजकीय अकसातून लावण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा रद्द करण्यात यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली असून, याबाबत तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही

महायुतीच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, रिपाइंचे नेते सचिन कागदे, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, भाजप युवा मोर्चाचे निळकंठ चाटे, शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे त्याचबरोबर सूर्यभान नाना मुंडे, प्रा.पवन मुंडे, दीपक नाना देशमुख, सुनील नाना फड, सुरेश अण्णा टाक, जयपाल लाहोटी, शरद भाऊ मुंडे, शकील भाई कुरेशी, अजीज भाई, सिराज भाई, रवींद्र परदेशी, सोफियाताई नंबरदार, युवतीच्या तालुकाध्यक्ष प्रा.शिल्पाताई मुंडे, वैशाली ताई तिडके, सुलभा साळवे, अर्चनाताई रोडे यांसह आदी उपस्थित होते.

बीड जिल्हा बंदच्या हाकेला प्रतिसाद देत लिंबागणेश येथे कडकडीत बंद

सरपंच संतोष देशमुख निर्घृण खुनप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येच्या निषेधार्थ व या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी व कठोर कारवाईच्या मागणीसाठी सकळ मराठा समाज व विविध राजकीय पक्ष यांनी आज दि.१३ शुक्रवार रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या हाकेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत लिंबागणेश येथील विविध व्यापारी, हॉटेलचालक, यांनी स्वतःहुन दुकाने बंद ठेवून बंद पाळला. स्व.सरपंच संतोष देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत या प्रकरणातील आरोपींच्या अटकेची मागणी करतच यामागील सुत्रधार, राजकीय दबावाखाली काम करणारे पोलिस प्रशासनातील अधिकारी यांच्यावर सुद्धा कारवाई करण्यात यावी अशी मागणी लिंबागणेशकर ग्रामस्थांनी केली आहे.

सकल मराठा समाजाच्या वतीने शिरूर शहर कडकडीत बंद

व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद- एस.आय.टी नेमण्याची मागणी

मानूर ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करणाऱ्या आरोपींना त्वरित अटक करून या प्रकरणात एस.आय.टी स्थापन करण्याची मागणी सकल मराठा समाज बांधवांनी पोलिसांना निवेदनाद्वारे केली आहे.जिल्हा बंदचे औचित्य साधून शिरूर

शहरात देखील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते.दिवसभर शहरासह तालुक्यातील महत्वाच्या बाजारपेठा असलेल्या गावांमध्ये देखील कडकडीत बंद पाळण्यात आला.या बंदला व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपला पाठींबा दिला.सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणी दोषी असलेल्या आरोपींना तात्काळ अटक करून या प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कडक कारवाई करण्याची मागणी संतोष गुजर,गणेश तांबे,बाळासाहेब गायकवाड,विनोद पवार,अशोक शिंदे,सागर काटे,स्वप्नील खोले,अमोल थोरात,शुभम काटे,सुनील सवासे,जगन्नाथ जाधव यांच्यासह मराठा बांधवांनी केली आहे.शहरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस स्टेशनच्या वतीने सहपोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी म्हणून पाटोदा कडकडीत बंद

पाटोदा (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील केज तालुक्या मधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची आरोपीने अमानुषपणे मारहाण करून क्रूरपणे हत्या केलेली आहे तरी सरपंच संतोष देशमुख यांचे मारेकरी असणारे आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी या मागणीसाठी पाटोदा तालुका कडकडीत बंद ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला या निषेध मोर्चात मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते

संपादकीय

दक्षिणेतला दिग्विजयी

भावनांचा बांध फुटला तरीही १८ वर्षांच्या गुकेशने सोंगट्या पुन्हा जागेवर रचून ठेवणे किंवा पत्रकार परिषदेत सुरुवातीस आवर्जून प्रतिस्पर्ध्याचा उल्लेख करणे, ही नम्रता अनुकरणीयच!

पहिल्या पाचातले दोन ग्रँडमास्टर मराठी होते. महिलांमध्ये पहिली आंतरराष्ट्रीय मास्टर मराठी होती. हे चित्र पुढे बदलले ते का, याचाही विचार यानिमित्ताने व्हावाकोणत्याही खेळाप्रमाणे बुद्धिबळातही जगज्जेतेपद मिळवणे सोपे नाही. आजवर दीडेक डझन खेळाडूंनाच ते जमले. त्यात पुरुषांमध्ये १८व्या वर्षी निर्विवाद जगज्जेतेपद ही तर आणखी दुर्मीळ बाब. भारताच्या दोम्माराजू गुकेशने ही अपूर्वाई साधली आणि मूळ भारतीय म्हणवला जाणाऱ्या या खेळाची पाळेमुळे या भूमीत खऱ्या अर्थाने रुजली असल्याची प्रचीती आणून दिली. विश्वनाथन आनंद हा भारताचा पहिला जगज्जेता. त्याचे साम्राज्य खालसा झाल्यानंतर ११ वर्षांनीच गुकेशने जगज्जेतेपद पटकावले. हे सगळे इतक्या लवकर घडून येऊ शकते, याची खात्री फारच थोड्यांना असावी. या थोडक्यांमध्ये स्वत: गुकेश होता हे महत्त्वाचे. दोम्माराजू गुकेश बुद्धिबळ जगज्जेतेपदाच्या लढतीत तोपर्यंत जगज्जेता असलेला चीनचा प्रतिस्पर्धी डिंग लिरेनपेक्षा गुणांकनाच्या बाबतीत सरस होता. तरीदेखील अशा लढतींची स्वत:ची अशी वैशिष्ट्ये असतात. या लढतींमध्ये खेळण्याचा अनुभव अनेकदा गुणांकन किंवा इतर निकषांपेक्षा सरस ठरू शकतो. तो डिंग लिरेनकडे होता. डिंग लिरेन गेल्या वर्षी जगज्जेता बनला. कारण त्याच्या आधीच्या वर्षी नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने पारंपरिक प्रकारात जगज्जेतेपदाच्या लढतींमधून 'निवृत्ती' जाहीर केली. त्याच्यासारख्या अपराजित आणि प्रतिभावान खेळाडूच्या माघारीमुळे बुद्धिबळविश्वात पोकळी निर्माण झालीच, तरी चुरसही वाढली. याचा फायदा घेणाऱ्यांमध्ये डिंग सर्वश्रेष्ठ ठरला. हा आणखी काही काळ जगज्जेतेपदावर राहू शकेल असे त्याच्याविषयी बोलले गेले. एरवी चिनी मंडळी ही मानसिकदृष्ट्या कणखर आणि भावनातीत थंड व्यवहारवादी मानली जातात. डिंग लिरेन अपवाद ठरला. उच्च स्तरावरील बुद्धिबळामध्ये सातत्याने चमकत राहण्यासाठी प्रचंड तयारीत राहावे लागते, मानसिक आणि शारीरिक ताणतणाव झेलावा लागतो. 'जगज्जेत्या'कडून त्या प्रमाणात अपेक्षाही वाढलेल्या असतात. त्या अपेक्षांचे, तयारीचे, ताणाचे ओझे लिरेनला पेलवले नाही. जवळपास नऊ महिने तो सर्व प्रकारच्या बुद्धिबळापासून दूर होता. मानसिकदृष्ट्या कोलमडला होता. त्याच्या अवस्थेबद्दल त्याचे प्रतिस्पर्धीही त्याची कीव करू लागले होते. कार्लसनच्या मते, लिरेन जगज्जेतेपदाची लढत खेळूच शकणार नाही इतका कोसळला होता. त्यातून डिंग सावरला, खेळला. इतकेच नव्हे तर गुकेशला तोडीस तोड ठरला. तरीदेखील त्याच्या तुलनेत गुकेशमध्ये अधिक ऊर्जा आणि ईर्षा दिसून आली हे नाकारता येत नाही. अखेरच्या टप्प्यात ही गुणद्वयीच निर्णायक ठरली. त्याची डिंग लिरेनविरुद्धची लढत सध्या चर्चेत आहे. पण जगज्जेतेपद हा गुकेशच्या प्रदीर्घ वाटचालीतला केवळ एक टप्पा आहे. ते शिखरही नव्हे. खुद्द गुकेशला याची पुरेपूर जाणीव आहे. या वाटचालीचा धांडोळा घेणे आवश्यक.

घनसावंगी तहसील कार्यालयात सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

अ.भा.ग्राहक पंचायतच्या मागणीला यश

घनसावंगी (प्रतिनिधी)

शासन परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ नूसार सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी / अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन हा तालूका स्तरावर राबविण्याचे निर्देश दिलेले असून प्रत्येक महिन्याचा तिसरा सोमवार लोकशाही दिनांचे आयोजन करावे. तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या निवेदनाचे अनुषंगाने दिनांक १६/१२/२०२४ रोजी तहसील कार्यालय, घनसावंगी येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आलेले असून. तालूका लोकशाही दिन कार्यक्रम तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली होणार असून त्यामध्ये गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, तालूका आरोग्य अधिकारी, तालूका कृषी अधिकारी, पशू वैद्यकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्यूत पारेषण कंपनी, सहाय्यक निबंधक, मुख्याधिकारी, नगर पंचायत, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम, उप अभियंता, मृद व जलसंधारण, उप अभियंता, जि.प.बांधकाम, दुय्यम निबंधक, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, उप अभियंता, जलसंधारण जि.प. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, यांचे तालूक्यातील विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सदरील लोकशाही दिनामध्ये तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरूपाची असावी. लोकशाही दिनाकरिता अर्जदाराने अर्ज विहीत नमून्यात १५ दिवस आधी २ प्रतीत देणे आवश्यक राहील. लोकशाही दिनामध्ये खालील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

१)न्यायप्रविष्ट प्रकरणे २)राजस्व / अपिल्स ३)सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी ४)विहीत नमून्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कादपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज ५)अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज ६)तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरूपाची नसेल तर.सदरील लोकशाही दिनी तालूक्यातील नागरीक, महिला व शेतकरी बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे. तसेच दिनांक १६/१२/२०२४ पासून तालूकास्तरीय लोकशाही दिन दरमहा तिसऱ्या सोमवारी सुरूच राहणार आहे.

पिंपळनेर शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

पिंपळनेर (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील जिल्हा परिषद कन्या शाळेत माजी पंचायत समिती सदस्य राजेश गवळी यांच्या वतीने माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त मुलींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक साहित्य वाटपाच्या आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक धारणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार अशोक होळकर, मच्छिंद्र साठे, प्रदीप आणेराव सह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच अध्यक्ष व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर शाळेतील पहिली ते आठवीपर्यंतच्या मुलींना शैक्षणिक साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राजेश गवळी यांच्या वतीने गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त प्रत्येक वर्षी शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते. यावर्षीही वही आणि पेन सर्व मुलींना वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला श्रीकांत ठोकरे, सखाराम बिटे, माऊली आणेराव, अजय रत्नपारखी, शिक्षक जाधव, शिक्षिका भोले सह विद्यार्थिनी शिक्षकेतर

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे रविवार रोजी मारोती महाराज सुरवसे यांचे कीर्तन

बीड (प्रतिनिधी)

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील चौथी पुण्यतिथी मार्गशीष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. भागवताचार्य मारुती महाराज सुरवसे जय हनुमान संस्तान ता. ज़ि बीड यांचे रविवार दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची

नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी बेलवाडी ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

बीड जिल्ह्याच्या पालकत्वाची भूमिका धनंजय मुंडेंनी चोखपणे निभावली; अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना दिलेला शब्द पूर्ण

बीड जिल्ह्यात ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या अनुदानापोटी ५४३ कोटी निधी मंजूर; ६ लाख १५ हजार शेतकऱ्यांना मिळणार लाभ

मुंबई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात खरीप हंगाम-२०२४ दरम्यान ऑगस्ट व विशेषकरून सप्टेंबर महिन्यात सातत्याने झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी अनुदान स्वरूपात मदत करण्याचा तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिलेला शब्द महायुती सरकारच्या माध्यमातून पूर्ण केला आहे. या काळात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यातील सुमारे ६ लाख १५ शेतकऱ्यांना ५४३ कोटी रुपये निधी अनुदानासाठी महसूल विभागाने मंजूर केला आहे व या निधीचे डीबीटी द्वारे थेट शेतकऱ्यांना वितरण करण्यात येणार आहे.

ऑगस्ट व विशेषकरून सप्टेंबर महिन्यात बीड जिल्ह्यात सर्वदूर व सातत्याने अतिवृष्टी व अनेक नद्यांना पूर आला होता. यावेळी खरिपातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री, आ.धनंजय मुंडे यांनी प्रशासनास सोबतीला घेऊन झालेल्या नुकसानीची पाहणी करत नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना आधार व धीर तर दिलाच मात्र शक्य तितक्या लवकर शासनाची मदत मिळवून देण्याचा शब्दही दिला होता.

त्यानंतर धनंजय मुंडेंच्या सुचनांना अनुसरून बीड जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे अहवाल प्राप्त करत राज्य शासनाकडे मदतीची मागणी केली होती. ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टीचे प्रमाण कमी असल्याने सुमारे २३ कोटी रुपये तर सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीची व नुकसानीची तीव्रता अधिक असल्याने सुमारे पावणे सहा लाख शेतकऱ्यांना ५२० कोटी रुपये इतकी मदत शासनाच्या मदतीच्या दरांना अनुसरून मंजूर करण्यात आली असून सदर निधी डीबीटीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर मदत तातडीने वितरित करण्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने तयारी केली असून, बाधित शेतकऱ्यांची माहिती डीबीटीवर अपलोड केली जाऊन शेतकऱ्यांना थेट बँक खात्यात सदर मदतीचे नियमानुसार तातडीने वितरण केले जाणार आहे. ऐन सुगीच्या काळात अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे अडचणीत सापडलेल्या बळीराजाला या मदतीमुळे मोठा दिलासा मिळणार असून, धनंजय मुंडे यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

मस्साजोग हत्या प्रकरणी एसआयटी द्वारे तपास करून आरोपिंना कठोर शिक्षा द्या

परतूर (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील मस्सजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निघृण खून करण्यात आला आहे. यात पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्यावरही थेट संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य ओळखून सरकारने खुनाचा छडा लावण्यासाठी त्वरीत एसआयटी नियुक्त करावी. तसेच जोपर्यंत चौकशी होत नाही तोवर धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात स्थान देऊ नये, अशी मागणी सकल मराठा समाज परतूर मंठा तालुक्याच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना, गृहमंत्री तसेच पोलिस महासंचालक यांना पाठवण्यात आले आहे.

परतूर शहरातील महादेव मंदिर चौक ते उपविभागीय कार्यालया पर्यंत सकल मराठा समाज परतूर मंठा तालुक्याच्या वतीने मुक मोर्चा काढून हातात काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी तालुक्यातील शेकडो मराठा बांधव मोर्चात सहभागी झाले होते. यासंबंधीच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सरपंच संतोष देशमुख यांचा खून राजकीय द्वेषापोटी करण्यात आला आहे.

परतूर मंठा सकल मराठा च्या वतीने मागणी मुक मोर्चा काढून मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर

धनंजय मुंडे यांचे कार्यकर्ते आरोपी निघाले आहेत. त्यामुळे मुंडे यांचा या प्रकरणात हात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. तशी चर्चा संपूर्ण बीड व छत्रपती संभाजीनगर सह जालना जिल्ह्यात देखील सुरू आहे. त्यामुळे माजी मंत्री धनंजय मुंडे यांना एसआयटी चौकशी पूर्ण होईपर्यंत मंत्रिमंडळात स्थान देऊ नये. अन्यथा महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाच्या रोषाला राज्य सरकारला सामोरे जावे लागेल. यांची गांभीर्याने दखल घ्यावी.

धनंजय मुंडे यांचा हस्तक कुख्यात गुंड वाल्मिक कराड यास मुख्य आरोपी करण्यात यावे, अशी मागणी देखील मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. शुक्रवारी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिस महासंचालक यांना हे निवेदन पाठवण्यात आले आहे. निवेदनावर सकल मराठा समाज परतूर मंठा तालुक्यातील अनेक मराठा बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. बांग्लादेश मधील हिंदूंवर होत असलेल्या अन्यायावर केंद्र शासनाने त्वरित दखल घ्यावी तसेच परभणी मधील संविधानाच्या विटंबने बद्दल निषेध व्यक्त करण्यात आला. बिड जिल्हा असो की माराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात सर्व समाज बांधव गुण्यागोविंदाणे नांदावेत यासाठी शासन व प्रशासने प्रयत्न करावेत अशी आशा याप्रसंगी श्रद्धांजली पार भाषणार व्यक्त केली.

पांढरवाडी स्मशानभूमीची प्रशासनाने घेतली दखल मानवी हक्क अभियान संघटनेला आले यश

देवणी ।प्रतीनिधी

देवणी हजारो वर्षापासुन विशिष्ट जात समुह सर्वंच साधन संपत्ती पासुन वंचित आसुन जीवन जगण्यासाठीची साधने तर त्यांचेकडे नाहीत,परंतु मृत्यू नंतर त्यांच्या अंत्यविधी साठी सुध्दा जागा नाही,दलितांची स्वातंत्र्य पुर्वीची अवस्था तीच अवस्था स्वातंत्र्य नंतर आज ही पहावयास मिळते,याच परिस्थीत पांढरवाडीचे दलित जीवन जगत आहेत.लातुर जिल्ह्यातील शिरुर अनंतपाळ तालुक्यातल्या पांढरवाडी येथे दलितांच्या वाहिवटीत आसलेल्या स्मशानभूमीत अंत्यविधी साठी विरोध केला जात होता तर,दलित स्मशानभूमी त्याच्या हक्काची नसल्यामुळे कोणत्याही दलित मयतांचा अंत्यसंस्कार वादात आणि तणावातचं करावं. लागायचं,मात्र काही दिवसांपूर्वी दलित व्यक्तीच्या अंत्यविधी साठी मज्जाव करण्यात आल्याने येथील दलितांनी मयतांचा अंत्यविधी रस्त्यावर केले आणि ही बातमी मानवी हक्क अभियानाचे लातुर जि.उपाध्यक्ष लक्ष्मण रणदिवे यांना समजली,त्यांनी तत्काळ घटनेची माहिती मानवी हक्क अभियानाचे लातुर जिल्हा सचिव मारुती गुंडीले यांच्याशी विचार विनिमय करुन त्यांनी व त्यांच्या टीमने पांढरवाडी येथील दलितांना तत्काळ स्मशानभूमीची व्यवस्था करुन द्यावे अन्यथा आभियांनाच्या संविधानिक संघर्षात्मक लढ्याला समोरे जावे लागेल असे आव्हान प्रशासनास दिले,या आव्हानाची बातमी प्रसिद्धीस आल्याने मानवी हक्क अभियानाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष कैलास भाऊ गायकवाड यांनी लक्ष्मण रणदिवे यांच्याशी संवाद साधुन

या कार्याला समर्थन दिले व पाठिंबा दर्शविले व याबाबत आवश्यक ती माहिती घेऊन हे प्रकरण कैलास गायकवाड यांनी मंत्रालयात लावुन धरले या प्रकरणी ग्रासरुटसवर लढा देणारे लक्ष्मण रणदिवे व मंत्रालयात पाठपुरावा चालविणारे कैलास गायकवाड यांच्या या मागणी रेट्यामुळे मुळे स्थानिक प्रशासनाने तत्काळ कार्यवाही चालविली असुन या गावात तहसिलदार शिरुर अनंतपाळ यांचे मार्फत स्मशानभूमीच्या जागेसाठी भुसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे,ही मागणी लावून धरण्याकामात लक्ष्मण रणदिवे यांच्या मागणीला मानवी हक्क अभियान संघटनेचे गजानन गायकवाड,डि.एन.कांबळे,अनिल घोडके,हरिभाऊ राठोड, अश्विनी वाघमारे,मीना वाघमारे,तानाजी वाघमारे,यांनी समर्थन देऊन पाठिंबा दिले होते या यशामुळे या सर्वांचे आभियांनाच्या परिवाराकडून कौतुक केले जात असुन सामाजिक स्तरावर या यशामुळे आनंद व्यक्त केला जात आहे.

चैत्य भूमीचे शिल्पकार यशवंतरावजी आंबेडकर यांची ११२ जयंती

भारतीय बौद्ध महासभा बीड च्या वतीने उत्साहात साजरी

बीड ।प्रतीनिधी

दि. १२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११वा. बीड बसस्थानक जवळच्या भारतीय बौद्ध महासभा जि.बीड पश्चिम च्या विहारात विश्वरत्न युगपुरुष,बौद्धीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जेष्ठ सुपूत्र, चैत्य भुमीचे शिल्पकार, भारतीय बौद्ध महासभेचे द्वितीय अध्यक्ष, बौद्धाचार्यांचे जनक, विधान परिषदेचे माजी सदस्य,महू ते चैत्यभुमी चे धम्म ज्योती पदयात्रेचे संयोजक, भारतभुषण मुद्रणालयाचे संचालक आणि बौद्ध तत्वज्ञानाचे पाईक यशवंतरावजी भिमरावजी आंबेडकर यांची ११२ वी जयंती भारतीय बौद्ध महासभा बीड पश्चिम चे विद्यमान अध्यक्ष आदरणीय महालिंग निकाळजे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न करण्यात आली. जगाला मानवतेचे,समतेचे,बंधुभावाचे विज्ञानवादी मार्ग दाखणारे शाक्यमुनी तथागत गौतम बुद्ध, विश्वरत्न, प्रज्ञासुर्य,युगपुरुष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि चैत्य भूमीचे शिल्पकार यशवंतरावजी भिमरावजी आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून सामुहीक बुद्ध वंदना घेण्यात आली.आणि या महामानवांना बीड समता सैनिक दलाने मानवंदना देऊन अभिवादन केले. या प्रसंगी राज्याचे संरक्षण सचिव आदरणीय अमरसिंग ढाका, कॅप्टन राजाभाऊ आठवले, जि. बीड महिला विभागाच्या अध्यक्षा आयु.अरूणाताई निसर्गध,माजी विभागीय सचिव आयु. निसर्गध साहेब, आयु. शोभाताई साळवी,आयु. मस्के ताई,आयु. पारवे ताई,आयु. ओव्हाळकरताई, शहर अध्यक्ष एडव्होकेट केतन गायकवाड,विंग कमांडर आयु. प्रशांत वासनिक, आयु.वासनिक ताई,आयु.गायकवाड ताई,आयु.बनसोडे गुरूजी,आयु. अनिल डोळस, आयु. संदेश डोळस, आयु.सोनवणे साहेब, बौद्धाचार्य पट्टेकर , डी.जी. वानखेडे काका आणि समता सैनिक दलाचे अनेक सैनिक उपस्थित होते. या प्रसंगी यशवंतरावजी आंबेडकर यांच्या धम्म कार्यावर प्रकाश टाकताना आयु.बनसोडे गुरूजींचे वय पाच वर्ष असताना सन १९६८ मध्ये यशवंतरावजी आंबेडकर यांनी मुंबई येथून बसने पाचशे कलोमीटर प्रवास करून बीड जिल्ह्यातील परळी येथे धम्म परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी आले होते त्यावेळी त्यांचे बनसोडे गुरुजीनी पुष्पहार घालून स्वागत केल्याचे आठवण सांगितले. आयु.सोनवणे साहेबांनी मनोगत व्यक्त करताना यशवंतरावजी आंबेडकर यांनी महू ते चैत्य भुमी पर्यंत धम्म ज्योतीची पदयात्रा काढून तमाम भारतीयांमध्ये बौद्ध धम्माची चेतना जागवली. त्यांनी निष्ठेने संपूर्ण भारत देशात धम्मचक्र गतिमान करण्याचे कार्य करून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आधुनिक समाज निर्मितीचे ध्येय गाठण्यासाठी आयुष्यभर कठोर परिश्रम घेतले आहेत. म्हणून आज भारत देशातील प्रत्येक जिल्ह्य आणि तालूक्यात भारतीय बौद्ध महासभेची कार्यकारणी कार्यरत झाले आहे. या सर्व कार्यकारिणींना विस्ताराने धम्म कार्य पुढे नेण्याची सुवर्ण संधी निर्माण करून दिली आहे. त्यांनी तन,मन,धनाने धम्म कार्यात पुढेच नेत राहतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. राज्याचे संरक्षण सचिव आयु.अमरसिंग ढाका यांनी या प्रसंगी मार्गदर्शन करताना वर्तमानातील आव्हानात्मक परिस्थितीत धम्म कार्याला गतिमान करणेसाठी आणि संरक्षणासाठी घर तेथे समता सैनिक निर्माण होण्याची नितांत आवश्यकता आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांनी सामाजिक हक्काधिकारांच्या संरक्षणासाठी सन १९२७ मध्ये समता सैनिक दलाची स्थापना केली आहे. २०२७ हे शतक पुर्त्तीचे वर्ष आहे. सन २०२७ पर्यंत किमान एक लाख समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अधिवेशन हरियाणातील पानीपत येथे घेण्याचा संकल्प समता सैनिक दलाचे विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय भिमरावजी यशवंतरावजी आंबेडकर यांनी केला आहे. त्यानी यशवंतरावजी आंबेडकर यांच्या धम्म कार्याची प्रेरणा घेऊन बौद्ध धम्माचे कार्य भारतासोबतच आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले आहेत. आजच्या आव्हानात्मक परिस्थितीत जगाला बौद्ध धम्माची खरी ओढ लागली आहे. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संयोजन आणि सूत्रसंचालन एडव्होकेट आयु. केतन गायकवाड यांनी केले केले आणि आयु संदेश डोळस यांनी आभार मानले शेवटी सरनातय घेऊन जयंती कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



मार्गशीर्ष उत्सवात श्री योगेश्वरी देवीच्या मंदीरात ५ ते ६ हजार आराधी मंडळाची मांदियाळी

मंदिरात बसलेल्या आराध मंडळांची मंदिर प्रशासनाकडून चोख व्यवस्था

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व अंबाजोगाईचे ग्रामदैवत असलेल्या श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत संपन्न होत आहे. या महोत्सवात केवळ अंबाजोगाई तालुकाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातुन देवीच्या मंदिरात बसण्यासाठी आराध मंडळ येत असते. यावर्षी देखील ५ ते ६ हजार आराध मंडळ देवीच्या मंदिरात बसले आहे. या सर्व भक्त मंडळींची कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची काळजी मंदिर प्रशासनाने घेतील असल्याचे देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच सचिव अशोक लोमटे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.यावर्षीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर रोजी वर्णी महापूजेने तहसीलदार विलास तरंगे यांच्या हस्ते योगेश्वरी देवीची विधीवत महापूजा करून प्रारंभ झाला. याच दिवसापासून मंदिरात आराध बसण्यासाठी महिलांची सुरुवात होते. मात्र मार्गशीर्ष। एकादशीपासून पाच दिवसासाठी देवीच्या मंदिरात आराध मंडळीची मोठी गर्दी होत असते.यावर्षी ५ ते ६ हजार आराध मंडळ बसले आहेत. या सर्व भाविकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याकडे मंदिर प्रशासन सज्ज आहे.या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवादारम्यान मंदिरात सलग नऊ दिवस वेगवेगळे धर्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ज्यामध्ये सुप्रसिद्ध शाहीर व भारुडकार नंदेश उमप यांचा भारुडाचा कार्यक्रम, रामयनाचार्य ह भ प ढोक महाराज यांचे कीर्तन, गायकवाड भगिनींच्या अभंगवाणी चे कार्यक्रम हे व असे दैनंदिन विविध प्रकारचे कार्यक्रम या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवात संपन्न होत आहेत. मंदिरातील विविध उपक्रमांना आराध मंडळ तसेच अंबाजोगाई पंचक्रोशीतील महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आलेल्या व येणाऱ्या भावीक भक्तांसाठी सर्व सुवीधा देण्यासाठी मंदीर प्रशासन कटिबद्ध आसल्याचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी व सचीव लोमटे यांनी सांगितलेआहे.अंबाजोगाईचे ग्रामदैवत श्री योगेश्वरी देवीचा दसऱ्याच्या वेळी नवरात्र व मार्गशीर्ष महोत्सव साजरा केला जातो. नवरात्रात व मार्गशीर्ष महोत्सवात देवल कमीटीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे अयोजन केले जाते. आई राजा ऊदोऊदो , अंबाबाईचा उदो उदो या जयघोषाणे व आराध्याच्या झांज व संबळाच्या आवाजाने मंदीर परीसर दुमदूमून जातो.

यावर्षी श्री योगेश्वरी देवीचा मार्गशीर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत साजरा होत आहे. रविवारी सकाळी वर्णी महापूजेने मार्गशीर्ष महोत्सवास प्रारंभ तहसीलदार विलास तरंगे व सौ मयुरी तरंगे यांच्या योगेश्वरी देवीची विधीवत वर्णी महापूजेने या महोत्सवास प्रारंभ करण्यात झाला.मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग ९ दिवस आराध



बसण्याची परंपरा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे. तीच परंपरा आजही सुरुच असुन यामध्ये पुरुष व महीला भावीक ९ तसेच ५ दिवस आराध म्हणून बसतात. त्यात सर्वाधीक महीलाची उपस्थिती असते. पाच ते सहा हजाराच्या जवळपास आराध म्हणून माहिला बसल्या आहेत.श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या वतीने आराध बसणाऱ्या महिलांसाठी आसण व्यवस्था निवासी असलेल्या महिलांसाठी चहा,फराळ, जेवण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आंघोळीची त्याचबरोबर सुलभ शौचालयाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे.मंदिर परिसरात मोठा मंडप देण्यात आला असून महिलांना सर्व सोयी व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. महोत्सवात मंदिर परिसरात दररोज विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम संपन्न होत आहेत. यात आराधी मेळा,संगीत भजन,कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचे सादरीकरण सुरू आसुन पारंपारिक कला प्रकारांच्या सादरीकरणाने भाविकांना भारावून टाकले आहे. मंदिरात सुरू असणाऱ्या कार्यक्रमांना महिलांची मोठी गर्दी झाली आसुन आराध बसलेल्या भावीकांची नोंद करुण त्यांना सुखसुवीधा देण्यासाठी पास देण्यात येत आहेत. मंदिरात येणाऱ्या भावीक भक्तांसाठी सर्व सुवीधा पुरविण्याचा प्रयत्न मंदीर प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असून या सर्व बाबींवर देवल कमिटीचे अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी , सचिव अशोक लोमटे, सहसचिव संजय भोसले, कोषाध्यक्ष विद्याधर पांडे यांच्यासह संपूर्ण देवल कमिटीचे सदस्य बारकाईने लक्ष ठेवून आहेत .

अंबड ते भालगाव- खडकेश्वर या निकृष्ट रस्त्याच्या कामाची सखोल चौकशी होईपर्यंत काम थांबवा

संबंधित ठेकेदार ,अधिकारी, इंजिनीयर यांच्यावर कार्यवाही करा - ग्रामस्थ

अंबड ।प्रतिनिधी

अंबड ते भालगाव हा महत्वाचा आणि जास्त वर्दळ असणारा रस्ता आहे. अंबड ते भालगाव हा रस्ता आजूबाजूच्या दहा ते बारा गावांना अंबड कडे येण्या जाण्यासाठी सोयीस्कर असुन कमी वेळात अंबडकडे जाता येते. परंतु या रस्त्याच्या कामाचा दर्जा ढासळलेला दिसून येत आहे, शासनाने दिलेल्या इस्टिमेटनुसार काम होताना दिसून येत नाही. त्यामध्ये मुरुमा ऐवजी माती टाकली आहे, डबर खडी, कच, अत्यंत निकृष्ट दर्जाची वापरली गेली आहे.शासनाच्या दिलेल्या नियमाचे पालन न करता संबंधित इंजिनीयर, कॉन्ट्रॅक्टदार यांचे कामात लक्ष राहिलेले नाही असे दिसून येते,

काही ०४ ते ०७ इस्टिमेट प्रमाणे २ डब्ल्यू बी एम च्या पैकी सिंगल लेअर केलेला आहे व ०७ पर्यंत संपूर्ण बीबीएम पूर्ण केलेला असून डांबराचा स्प्रे अल्प प्रमाणात मारल्यामुळे ठिकठिकाणी समोर रोड चालू आणि मागे रोड उखडत आहे, म्हणजेच कामाचा दर्जा कसा आहे याची कल्पना येते.तरी मा. जिल्हाधिकारी साहेब जालना यांनी या कामाकडे लक्ष देऊन सबंधित कामाची सखल चौकशी करून या मध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकारी, इंजिनीयर, गुत्तेदार यांच्यावर कार्यवाही करावी, तसेच अनेक वेळा या निकृष्टरित्या होणारा रोड गावातील नागरिकानी बंद पाडला होता परंतू चांगला रोड करून देऊ असे आश्वासन सबंधित इंजिनियर आणि गुत्तेदार यांनी गावकऱ्यांना दिले होते.आणि शासन नियमाप्रमाणे या रोडचे काम दर्जेदार

होईल याकडे लक्ष दिले जाईल असे सांगितले होते.परंतु काम दर्जेदार न करता निकृष्ठ दर्जाचे काम होत असल्याचे गावातील सुजाण नागरिक अनिल डवले, संतोष मुळे, मनसे शेतकरी सेना तालुकाप्रमुख भगवान खंडागळे, नरसिंग मुळे,आदी गावकऱ्यांच्या लक्षात आल्यामुळे या रस्त्यांच्या कामासंदर्भात त्यांनी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना कक्ष कार्यालय जालना यांना निवेदन दिले असून या रस्त्याच्या कामाकडे मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी लक्ष द्यावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून उपस्थित होत आहे.

लक्ष्मीआई तांड्याची एक आदर्श मुहूर्तमेढ

बीड ।प्रतिनिधी

आदर्श असणं एक सन्मानाचं प्रतीक आहे परंतु, आदर्शाची परंपरा राखणं हे वैभवशाली ऐतिहासिक सन्मान आहे. वैभवशाली परंपरा जपणारा सुपुत्र एखाद्या पित्याच्या पोटी जन्माला येत असेल तर, यापेक्षा मोठं सुख दुसरं काय असू शकेल...! बीड पासून १५-१६ किलोमीटर अंतरावर असलेलं लक्ष्मीआई तांडा..! विकासाची गंगा ज्यांच्या लांब वेशी पासून वळसा घेऊन कडेकडेने जाते अश्या वंचित लोकांचा आणि ऊसतोड करून उपजीविका भागविणारा समाज..! प्रगत प्रवर्गातून हुंदडत येणारा विकास याठिकाणी कष्टी मनाने चालत, लोळत आलेला विकास कपाळावरच्या घड्यावर विसंबून न राहता कष्टाच्या बळावर खेचून आणायचा असतो, हि परंपरा जपणारे पहिला शिक्षक ते पहिला डॉक्टर हा आदर्श घालून देत भविष्याचा पाया रचला.शिक्षणातून आधुनिकतेची कास धरली जाऊ शकते, शिक्षणातून समृद्धीकडे वाटचाल होऊ शकते याचं आदर्श डोळ्यासमोर नसताना या समाजातील दिशाहीन तरुणांना चाचपडत चाचपणी करीत यशाच्या महामार्गाचा धांडोळा घेत सफाईदार राजमार्ग तयार करून दिल्यानंतर अनेक तरुण शिखरावर पोहोचली.

लक्ष्मीआई तांडा व पंचक्रोशीतील बंजारा समाजातील पहिला शिक्षक होण्याचा बहुमान मिळवणारे शिक्षक म्हणजे...श्री अंकुश राठोड सर होय. आणि त्यानंतर त्यांचेच चिरंजीव आणि आमचे छोटे बंधू डॉ.ऋषिकेश अंकुश राठोड यांनी या तांड्यातून पहिला डॉक्टर होण्याची परंपरा कायम राखल्याने चर्चेचा विषय ठरला आहे. आज दि. ११/१२/२०२४ रोजी मादळमोही या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी वर्ग १ म्हणून नियुक्ती झाली आहे. या यशाबद्दल समाजातल्या अनेक स्तरातून या पिता-पुत्राचा स्वागत करण्यात येत आहे.

पहिल्याच प्रयत्नात चइइड डॉक्टर होणारा डॉ.ऋषिकेश राठोड थांबलेला नसून ख-ड अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून आहे...! वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी डॉक्टर होऊन आई वडीलांची इच्छा पुर्ण केली आहे. परंतु, डॉ.ऋषिकेश पुढच्या पाच वर्षांत ख-ड अधिकारी होण्याचं आपलं स्वप्न पूर्ण करण्याची खुणगाठ उराशी बाळगून तयारी करतो आहे.त्यांची ही दैदिप्यमान वैभवशाली ऐतिहासिक परंपरा कायम राहो व पुढच्या पिढीला मार्गदर्शन व मार्गदर्शक ठरो हीच लाख मनाच्या शुभेच्छा...!!!

पहिल्याच प्रयत्नात डॉक्टर होणारा डॉ.ऋषिकेश राठोड IAS अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून

बीड गोळीबार प्रकरणी आमदाराचा समर्थक आरोपी असल्याने आमदाराची चौकशी करा

डॉ.योगेश क्षीरसागर यांची पोलीस प्रशासनाकडे मागणी

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही, म्हणत बोंब ठोकणाऱ्या बीडच्या आमदाराशी संबंधित व्यक्ती गोळीबार प्रकरणात आरोपी आहे. अशी प्रकरणे बीड विधानसभा मतदारसंघात आमदाराच्या वरदहस्तामुळे सातत्याने घडत आहेत. त्यामुळे गोळीबार प्रकरणाची सखोल चौकशी करून आमदाराला सहआरोपी करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना अटक करून कडक कारवाई करावी ही आपली सुरुवातीपासूनच भूमिका आहे. या प्रकरणात बीडच्या आमदाराने राजकारण करत राजकीय भांडवल होईल, अशी विधाने केली. ती विधाने करण्याचा नैतिक अधिकार त्यांनी केव्हाच गमावलेला आहे. गत पाच वर्षात व्यापारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांना ब्लॅकमेल करण्यापलीकडे त्यांनी दुसरे काहीही केलेले नाही. मागे बीडमध्ये आदित्य कॉलेजजवळ झालेल्या खून प्रकरणात आमदाराचे जवळचे नातलग आरोपी आहेत. दोन-अडीच वर्षापूर्वी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ड.राजेंद्र राऊत यांच्यावर राजकीय दबावातून आमदारांनी खोटी ट्रॉसिटी व ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करायला लावले. माझ्यासह सहकाऱ्यांवर हनुमंत वाघमारे यांच्याकरवी करायला लावलेली ट्रॉसिटी देखील पूर्णपणे खोटी ठरली. तसेच सतीश पवार यांच्या संपत्तीच्या प्रकरणात वारंवार हस्तक्षेप करून आमदाराने खंडणी गोळा करण्यासाठी गुंड पाठविले. त्यावेळी रजिष्ट्री कार्यालयात हल्ला घडवून आणला, त्यावेळी आत्मसंरक्षणासाठी परवानाधारक शस्त्रातून सतीश पवारांना हवेत गोळीबार करावा लागला, हा इतका मोठा वाद आमदारांनी निर्माण केला. अशा खोट्या केसेस

करण्यासाठी काही दलित बांधवांना हाताशी धरून त्यांचा वापर केला जातो. त्यामुळे समाजात तेढ निर्माण होते. हा आमदाराचा इतिहास पाहता बीडच्या गोळीबार प्रकरणात देखील त्यांचा हात असू शकतो, आरोपी हा त्यांच्याशी संबंधित व्यक्ती आहे. त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचे धडे शिकविणाऱ्या बीडच्या आमदाराची देखील कसून चौकशी व्हायला हवी, अशी मागणी डॉ. योगेश क्षीरसागर यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

मस्साजोग खून प्रकरणाचे राजकारण करू नये; पवनचक्की प्रकरणात चौकशी कराच

केज तालुक्यातील मस्साजोग खून प्रकरणाचे बीडच्या आमदाराने राजकरण करू नये. आरोपींसोबतचे माझे फोटो व्हायरल करून खोटे आरोप केले जात आहे. माझी कोणतीही चौकशी करावी, मी कसल्याही चौकशीसाठी तयार आहे. यात माझा कुठेही संबंध आढळून आल्यास राजकीय संन्यास घेईल. परंतु बीडमध्ये आमदाराचा वरदहस्त असल्यामुळे पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली आहे. त्यामुळे पवनचक्कीच्या प्रकरणात बीडच्या आमदाराचीही कसून चौकशी व्हावी. कॉल डिटेल्स तपासवेत. त्यासाठी ते तयार आहेत का? हे बगलबच्चांनी आमदाराला विचारून स्पष्ट करावे. याबाबत आमदाराने मीडियासमोर पुढे येऊन बोलण्याची तयारी दाखवावी, असे आव्हान डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले आहे.

आसरडोह ओबीसी घरकुलात मोठा भ्रष्टाचार

चौकशी करून गुन्हा दाखल करा अन्यथा अमरण उपोषण-अरुण तोडकर

बीड: धारूर तालुक्यातील आसरडोह येथे ओबीसी प्रवर्गातील घरकुलामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून गावचा ग्रामसेवक पंचायत समीतीचा इंजिनियर आणि विस्तार अधिकारी यांनी संगनमत करून घरकुलांचे कसलेही बांधकाम न करता मलीदा लाटला आहे

गटविकास आधिकारी पंचायत समिती धारूर यांना दिलेल्या लेखी निवेदनात अरुण तोडकर यांनी म्हटले आहे कि, ओबीसी घरकुलांचे पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात दोन दोन हप्ते जमा झाले खरे मात्र त्यांनी कुठल्याही घरकुलाचे कसलेही बांधकाम केलेले नाही तरीही त्यांच्या खात्यात हप्ते जमा झाले कारण प्रत्येक हप्त्या पोटी लाभार्थ्याकडून पाच पाच हजार रुपये घेतल्या मुळे असरडोह येथे हा चमत्कार घडु शकला आणि सरकारी अधिकाऱ्याच्या खाबुगीरी मुळे घरकुलांचे बोगस हप्ते लाभार्थ्यांना मिळाले, ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून ग्रामसेवक व पंचायत समितीच्या इंजिनियर व इतर आधिकाऱ्यामुळे शासनाच्या घरकुल योजना उद्देशाला काळीमा फासला गेला आहे शेकडो घरकुलात प्रतिहप्ता पाच हजार या प्रमाणे आसरडोह येथे लाखो रुपयाचा भ्रष्टाचार झाला असून या गंभीर प्रकरणाची चौकशी करून संबंधित भ्रष्ट आधिकाऱ्यावर योग्य ती उचित कारवाई करावी अन्यथा मी दि २६ जानेवारी २० २५ रोजी आत्मदहन करील असा इशारा निवेदनातून अरुण तोडकर यांनी दिला आहे

असा कुठला अनुचित प्रकार घडला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी मा गटविकास आधिकारी धारूर यांची राहिल.

जिल्हा परिषद केंद्रशाळा डोणगाव येथे केंद्रस्तरीय गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन

शहागड ।प्रतिनिधी

दि. १३ डिसेंबर रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा डोणगाव येथे गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री मुजीब भाई पटेल अध्यक्ष शा व्य समिती डोणगाव यांनी भूषवले.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री गोविंदजी चव्हाण साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अंबड,श्री आंबटकर सर केंद्रप्रमुख डोणगाव,श्री योगेश झांबरे, केंद्रप्रमुख नालेवाडी ,श्री चव्हाण केंद्रीय मुख्याध्यापक नालेवाडी,श्री मदन पवार केंद्रप्रमुख शहागड, श्री जगन दुर्गे मुख्याध्यापक धर्मवीर संभाजी विद्यालय डोमेगाव, श्री खेडकर सर मुख्याध्यापक स्वामी गणेश चतुर्थी विद्यालय डोणगाव, श्री सुभाषराव वाघमारे मुख्याध्यापक कोळी शिरसगाव , उपस्थित होते

तसेच यावेळी श्री गोविंदजी चव्हाण साहेबांनी

जीवनातील स्पर्धेचे महत्त्व सांगितले तसेच अध्यक्ष श्री मुजीब पटेल यांनी प्रश्नमंजुषा तसेच शाळेची माहिती सर्वांना करून दिली व शाळेच्या वतीने त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.यावेळी या उत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय मुख्याध्यापक श्री बंडू बांगर सर तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संतोष पालवे सर यांनी केले.

ओजस अनिल कुलकर्णी ची इस्रो अभ्यास सहली साठी निवड

माजलगाव/प्रतिनिधी

नोबेल फांऊडेशन आणि भवरलाल जैन फांऊडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरात नोबेल सायन्स टॅलेंट सर्च (छडढड) ही परीक्षा घेतली जाते,यात प्रथम पात्रता परीक्षा नंतर लेखी परीक्षा आणि त्यात निवड होणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांची मुलाखत परीक्षा घेतली जाते.या तिन्ही अडथळ्यांच्या परीक्षा पूर्ण केल्यानंतर इयत्ता निहाय विद्यार्थ्यांची निवड केली जाते.या परीक्षेत यश मिळवून निवडलेल्या विद्यार्थ्यांना या फाऊंडेशन मार्फत प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देण्यात येतेच परंतु या बाल वैज्ञानिकांना इस्रो या भारतीय अवकाश संशोधन केंद्र या ठिकाणी अभ्यास सहलीला जाण्याची संधी मिळते. शहरातील सिंधफणा पब्लिक स्कुल माजलगाव याठिकाणी इ.८ वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी चि.ओजस अनिल

कुलकर्णी याची यावर्षी निवड झालेली आहे. विशेष म्हणजे या परीक्षेत त्याच्या इयत्तेतून तो महाराष्ट्रातुन ३ रा क्रमांक आला आहे.शिवाजी नगर माजलगाव येथे राहणारे जिल्हा परिषद शिक्षक अनिल सुभाषराव कुलकर्णी नागडगावकर यांचा तो मुलगा आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे शाळेद्वारे व समाजा तील सर्व माध्यमाद्वारे कौतुक करण्यात येत आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांड प्रकरणी शिरूर तालुका कडकडीत बंद!

शिरूर कासार ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील लोकप्रिय सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांचे अपहरण करून अमानुषपणे मारहाण करून क्रूरपने हत्या करण्यात आली या हत्याकांडाच्या निषेधार्थ संपूर्ण बीड जिल्हा बंद असून त्याच अनुषंगाने शिरूर तालुका पूर्णपणे कडकडीत बंद आहे, यामध्ये शिरूर शहर रायमोहा अशा मोठाल्या बाजारपेठा आज कडकडीत बंद पाळण्यात आला या हत्याकांडतील ती आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करून फाशी द्यावी व या संपूर्ण प्रकरणाची चौकशी एसआयटी मार्फत चौकशी व्हावी यातील गुन्हेगाराला व प्रशासनातील पोलीस कर्मचारी जे दोषी आढळते त्यांच्यावर सुद्धा कार्यवाही करावी अशी मागणी सकल मराठा समाज शिरूर कासार यांच्या वतीने करण्यात आले आहे सदरील मागणीचे निवेदन हे पोलीस प्रशासनाला

देण्यात आले असून शहरात या प्रकरणाचा निषेध करत रॅली काढून शेवटी जिजामाता चौकात स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मस्सा जोग येथील प्रकरणाचा जलद गतीने तपास करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

बीड ।प्रतिनिधी

मस्सा जोग ता. केज जि येथीलमाजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हस्तेच्या अनुषंगाने आज डॉ. श्रीकृष्ण पंचाळ जिल्हाधिकारी बीड यांनी केज येथील तहसील कार्यालयात एक बैठक घेतली व सदर प्रकरणाचा जलद गतीने तपास करण्याचे निर्देश जारी केले. सदर प्रकरणी तातडीने चौकशी करून संबंधित आरोपी विरुद्ध कायदेशीर कार्यवाही अनुसरण्याची दक्षता घेण्यात येत आहे तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शांतता राखण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृन हत्येच्या निषेधार्थ

पुकारलेल्या बंदला केज शहरात शंभर टक्के प्रतिसाद

केज ।प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांची निघृणपणे हत्या करण्यात आली या घटनेच्या निषेधार्थ बीड जिल्हा बंद चे आवाहन करण्यात आले होते.या बंदला केज शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने शंभर टक्के बंद ठेवून आपला निषेध नोंदवला आहे. याबाबत सविस्तर माहीती अशी की,सोमवार दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी सोमवारी संतोष देशमुख मस्साजोग कडे जात असताना डोणगाव फाट्यावरील टोलनाक्या जवळ त्यांची गाडी अडवुन गाडीची काच फोडून त्यांचे अपहरण करून त्यांची

दहीटना शिवारात निघृण हत्या करण्यात आली होती.या घटनेने परिसरातखळबळ माजली होती.अवादा कंपनीच्या पवनचक्की येथील आर्थिक खंडणी मागणीवरुन हा वाद झाला होता त्यानंतर ही खुनाची घटना घडली होती.मुख्य आरोपीसह सर्व आरोपींना अटक होई पर्यंत मृत देह ताब्यात घेणार नाही असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेत तब्बल दिवसभर रास्तारोको आंदोलन केले होते.या प्रकरणी आतापर्यंत तीन आरोपी ताब्यात घेतले असुन अन्य आरोपीचा पोलिस शोध घेत आहेत. या पार्श्वभूमीवर दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी बीड जिल्हा बंदची हाक

परळी ।प्रतिनिधी

परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ भारतीय संविधान पुस्तकेची विटंबना प्रकरण आणि मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणी शुक्रवार दि १३ रोजी परळी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.या घटनेतील दोषीवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी यावेळी सर्व स्तरातून करण्यात आली.

मांडवा येथे आज प्रसिद्ध काळभैरव यात्रोत्सव : पालखी सोहळा व काल्याचे कीर्तन

मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे गावकऱ्यांचे आवाहन

परळी ।प्रतिनिधी

तालुक्यातील मांडवा येथे मार्गशिष पोर्णिमेला काळभैरवाची मोठी यात्रा भरते. या यात्रेला दरवर्षी मराठावाड्यासह आंध्र प्रदेश, तेलंगणा आदी. परराज्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. आंध्रप्रदेशातील लभान समाजातील भाविक काळभैरवाला आपले कुलदैवत मानत असल्याने मोठ्या प्रमाणात हे भाविक यात्रोत्सवास आवर्जून उपस्थित राहतात.मांडवा येथे उद्या (दि.१४)रोजी प्रसिद्ध काळभैरव यात्रोत्सव असुन मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन मांडवा गावकऱ्यांनी केले आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षीही ग्रामस्थांच्या वतीने भव्य यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या दि.१४ रोजी सकाळी ९ते ११ श्री पारंपरिक पालखी मिरवणूक आणि मंदिर प्रदक्षिणा होईल व दु. १२ ते २ वाजता ह.भ.प विठ्ठल महाराज उखळीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने यात्रोत्सवाचा समारोप होईल. या कार्यक्रमासाठी विविध श्रेत्रातील मान्यवर व साधूसंतांची उपस्थिती लाभणार आहे. भाविकांनी भव्य यात्रोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन मांडवा गावकऱ्यांनी केले आहे.

नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांना मातृशोक

परळी (प्रतिनिधी)

परळी तहसीलचे नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांच्या मातोश्री श्रीमती नागरबाई लक्षमण रुपनर रा. परचुंडी यांचे दि १३ वार शुक्रवार रोजी रात्री १-३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले.श्रीमती.नागरबाई या खूप धार्मिक कार्यात सहभागी

,सामजिक कार्यात सहभागी असत तसेच महिलांना संघटीत करून बचतगटाच्या माध्यमातून अनेक महिलांना स्वावलंबी बनवले .त्यांचा मायाळू स्वभावामुळे त्या सर्वपरिचित होत्या त्यांच्या अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात ३मुले १ मुलगी सुना व नातवंड असा परिवार आहे.

बीड जिल्ह्याच्या पालकत्वाची भूमिका धनंजय मुंडेंनी चोखपणे निभावली; अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना दिलेला शब्द पूर्ण

बीड जिल्ह्यात ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या अनुदानापोटी ५४३ कोटी निधी मंजूर ६ लाख १५ हजार शेतकऱ्यांना मिळणार लाभ

मुंबई ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात खरीप हंगाम-२०२४ दरम्यान ऑगस्ट व विशेषकरून सप्टेंबर महिन्यात सातत्याने झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी अनुदान स्वरूपात मदत करण्याचा तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिलेला शब्द महायुती सरकारच्या माध्यमातून पूर्ण केला आहे. या काळात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यातील सुमारे ६ लाख १५ शेतकऱ्यांना ५४३ कोटी रुपये निधी अनुदानासाठी महसूल विभागाने मंजूर केला आहे व या निधीचे डीबीटी द्वारे थेट शेतकऱ्यांना वितरण करण्यात येणार आहे.

ऑगस्ट व विशेषकरून सप्टेंबर महिन्यात बीड जिल्ह्यात सर्वदूर व सातत्याने अतिवृष्टी व अनेक नद्यांना पूर आला होता. यावेळी खरिपातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री, आ.धनंजय मुंडे यांनी प्रशासनास सोबतीला घेऊन झालेल्या नुकसानीची पाहणी करत नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना आधार व धीर तर दिलाच मात्र शक्य तितक्या लवकर शासनाची मदत मिळवून देण्याचा शब्दही दिला होता.

त्यानंतर धनंजय मुंडेंच्या सुचनांना अनुसरून बीड जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे अहवाल प्राप्त करत राज्य शासनाकडे मदतीची मागणी केली होती. ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टीचे प्रमाण कमी असल्याने सुमारे २३ कोटी रुपये तर सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीची व नुकसानीची तीव्रता अधिक असल्याने सुमारे पावणे सहा लाख शेतकऱ्यांना ५२० कोटी रुपये इतकी मदत शासनाच्या मदतीच्या दरांना अनुसरून मंजूर करण्यात आली असून सदर निधी डीबीटीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सदर मदत तातडीने वितरित करण्याच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने तयारी केली असून, बाधित शेतकऱ्यांची माहिती डीबीटीवर अपलोड केली जाऊन शेतकऱ्यांना थेट बँक खात्यात सदर मदतीचे नियमानुसार तातडीने वितरण केले जाणार आहे. ऐन सुगीच्या काळात अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे अडचणीत सापडलेल्या बळीराजाला या मदतीमुळे मोठा दिलासा मिळणार असून, धनंजय मुंडे यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

मराठा सेवा संघ धारूर तालुकाध्यक्षपदी कृष्णा थोरात तर शहराध्यक्षपदी शुभम निक्ते यांची निवड

धारूर ।प्रतिनिधी

धारुर शहरात दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी मराठा सेवा संघ बैठक आयोजीत करण्यात आली होती या बैठकीचे अध्यक्ष मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गोकुळ जगताप व संदीप भैया शिनगारे हे उपस्थित होते.बैठकीत मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजलीअर्पण करण्यात आली.यावेळी विविध मान्यवरांनीआपले मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी मराठा सेवा संघाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा सांगण्यात आला.तसेच समाज जाती जाती मध्ये विखुरलेला होता तर तो समाज बहुजन समाज म्हणून सर्व जातीलासोबत घेवून जाणारी संघटना म्हणजेच मराठा सेवा संघ आहे असे सांगण्यात आले.या बैठकीत सर्वानुमते धारूर तालुका अध्यक्षपदी श्री.कृष्णा थोरात यांची निवड करण्यात आली तसेच शहराध्यक्षपदी श्री.शुभम निक्ते यांची निवड करण्यात आली तसेच तालुका सचिव म्हणून श्री.शशिकांत साखरे यांची निवड करण्यात आली.या बैठकीला धारुर शहरातील श्रीनिवास दरेकर,सचिन थोरात, लक्ष्मण मोरे,ड.रवि सावंत,संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष रमेश मोरे, पवन निक्ते,ड.युवराज फुन्ने यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीचे सूत्रसंचालन रमेश मोरे यांनी केले तर आभार श्रीनिवास दरेकर यांनी मानले.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय अंबाजोगाई येथे आ.नमिताताई मुंदडा यांनी घेतली व्यापक बैठक

केज ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील ११ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये बनावट औषधे आढळल्याच्या पार्श्वभूमीवर दि.१३ डिसेंबर २०२४ रोजी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात संबंधित प्रशासन व सर्व विभाग प्रमुख डॉक्टर्स यांची आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांनी संयुक्त बैठक घेऊन माहिती जाणून घेतली.केज विधानसभा मतदारसंघात आरोग्य सेवेत कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार सहन केले जाणार नाहीत. औषधांची ऑर्डर देताना संबंधित कंपनीची संपूर्ण चौकशी करूनच ऑर्डर द्यावी अशा सूचना देखील रुग्णालय अधिष्ठातांना दिल्या.यासोबतच रुग्णालयातील इतर समस्या आणि रुग्णसेवे चा दर्जा वाढविण्याबाबत चर्चा झाली.यावेळी भाजपाचे जेष्ठ नेते श्री. नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) व इतर पदाधिकारी,कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वारस प्रमाणपत्रा बददल जाहीर घोषणा

श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क. ९४१ / २०२४ भिमा व इतर ०२ वि. निरंक
(मार्फत ॲड बी. के. निकाळजे, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे अमोल भिमराव थोरात, मौज रा. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड. हे दिनांक २२/१०/२०२४ रोजी मौजे पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड. येथे मयत झाले.

अर्जदार :- ०१. भिमा पि. आश्रुबा थोरात, वय ५२, धंदा मंजुरी, रा. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड.

०२. वैजंता भ्र. भिमा थोरात, वय ४७, धंदा घरकाम, रा. सदर.

०३.सुदर्शन पि. भिमा थोरात, वय ३०, धंदा मजुरी, रा. सदर

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अमोल भिमराव थोरात, मौज रा. पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड. यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ११/१२/२०२४ माझया सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १६/०१/२०२४

स्वाक्षरित
क.लिपीक

आदेशावरून
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर,
गेवराई ता. गेवराई, जि. बीड

जाहिर प्रगटन

मा. श्री. व्ही. सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १५८०/२०२४ ड. गडकर एम. ए. यांच्या मार्फत
मिराबाई हनुमान धायगुडे वि. निरंक
ज्यापेक्षा हनुमंत उर्फ हनुमान पि. मोहनराव धायगुडे, हे दिनांक २९.१२.२०२३ रोजी पाटेगाव ता. कर्जत जि. अहमदनगर येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१.मिराबाई भ्र. हनुमान धायगुडे, वय - ७२ वर्षे, धंदा :- घरकाम / शेती, ग. हनुमान मंदीरा जवळ, काळा हनुमान ठाणा बीड ता. जि. बीड.

२.आकाश पि हनुमान धायगुडे, वय - ३३ वर्षे, धंदा :-मजुरी, रा. वरीलप्रमाणे.

३.अरूण पि. हनुमान धायगुडे, वय - ३० वर्षे, धंदा :मजुरी, ग. वरीलप्रमाणे.

४.सुरेखा भ्र. सोनाजी मदने, वय- २८ वर्षे, धंदा :- घरकाम, रा. काजळा ता. बदनापुर जि. जालना.

अर्जदार क १ ही मयत नामे हनुमंत उर्फ हनुमान पि. मोहनराव धायगुडे, यांची पत्नी असून, अर्जदार कं २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार कं ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत हनुमंत उर्फ हनुमान पि. मोहनराव धायगुडे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १८ / ०१ / २०२५ आहे.

आज दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

स्वाक्षरित
क.लिपीक
दिवाणी न्यायालय, क.स्तर,बीड

आदेशावरून
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर,बीड

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स)लेझर सेंटर
डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे
(नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर
व लेझर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच
महिला मुळव्याध तज्ञ
डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
महिला रूगणांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.
मुळव्याध करीता विशेष उपचार
- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार

हॉस्पिटलचा पत्ता
शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँण्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

आंबेडकरी वस्त्यातील कोंबिंग ऑपरेशन थांबवा – रिपाइं

बीड ।प्रतिनिधी

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे एका माथेफीरुने संविधान प्रतीचा अवमान केला आहे. त्यामुळे संबंध देशवासीयांच्या भावना दुखावल्या आहेत.तसेच मसाजोग येथील सरपंच देशमुख यांच्या हत्येतील आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ बीड रिपाइं मध्यवर्ती कार्यालयापासून बीड जिल्हाधिकारी पर्यंत जाऊन निदर्शने करण्यात येऊन त्यांना शुक्रवार (ता.१३) रोजी निवेदन सादर करण्यात आले.

सदरील आंदोलन रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मंत्री रामदास आठवले, युवा रिपाई प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली, रिपाइं सरचिटणीस राजू जोगदंड यांच्या उपस्थितीत व रिपाईचे धडाडीचे क्रियाशील तालुका अध्यक्ष किशन तांगडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की भारतीय संविधान प्रतीचा अवमान करणाऱ्या माथेफिरु आरोपीला कठोर शिक्षा करण्यात यावी, तसेच परभणी पोलिसांकडून आंबेडकरी वस्त्यांमध्ये कोंबिंग ऑपरेशन सुरू आहे ते कोंबिंग ऑपरेशन तात्काळ थांबविण्यात यावे. देशाच्या सर्वोच्च स्थानी भारतीय संविधान आहे. या संविधानाचा कोणी अवमान करत असेल तर त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारची गय केली जाऊ नये. भारतीय संविधान देशातल्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण देण्याचे काम करते. जर कोणी त्याचा अवमान करत असेल तर प्रशासनाने देखील ही बाब गंभीरतेने घेणे गरजेचे आहे. भारतीय संविधानाचा अवमान करणाऱ्या माथेफिरुच्या विरोधात कठोर कारवाई व्हावी. अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

यावेळी मायाताई मिसळे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, प्रभाकर चांदणे,नवनाथ डोळस, भैय्यासाहेब मस्के, भीमराव घोडेराव,राहुल कांबळे,रामेश्वर खळगे,देवानंद वाघमारे,मंगेश पवार, राजेभाऊ वक्ते, महेंद्र वडमारे, भैय्यासाहेब वाघमारे, सुरेखा डोंगरदिवे, विशाल इंगोले, धम्मा पारवेकर, आनंद मोरे, विशाल वक्ते, देवानंद वाघमारे, समाधान गवळी, अनिता तुरुकमारे, संभाजी गायकवाड,प्रविण निसर्गंध, मनोज बोराडे, मंगेश पवार, विकाश ओव्हाळ, रमेश जावळे, अविनाश गायकवाड, राहुल गायकवाड, सुवर्णा मिसळे, शोभा गलांडे, रमेश जावळे, यांच्यासह रिपाइंचे पदाधिकारी,

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ पुकारलेल्या बंदला अंबाजोगाईतील व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

सर्वत्र बंद शांततेत, अनुचित प्रकार नाही

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या अंबाजोगाई बंदला व्यापाऱ्यांनी सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष पंडितराव देशमुख व त्यांचे सहकारी शिवराज लिंबराज देशमुख हे चार दिवसा पूर्वी आपल्या चार चाकी मधून केजहुन मस्साजोग कडे जात असताना टोलनाक्या नजीक असलेल्या डोंनगाव फाट्या नजीक यांचा पाठलाग करणाऱ्या ३ वाहनांनी संतोष देशमुख यांच्या गाडीला आडवी गाडी लावली, लागलीच मागून आलेल्या काळी स्कॉरपीओ मधील हल्लेखोरांनीसंतोषचा जबरदस्तीने दरवाजा उघडून त्याला बाहेर खेचले आणि स्कॉरपीओ मध्ये कोंबून ही सुसाट वेगाने केजच्या दिशेने रवाना झाली आणि अवघ्या ३ तासाच्या आत संतोषचा मृतदेह मिळाल्याची वार्ता कानावर येऊन धडकली आणि जिल्ह्याचे वातावरण तापले, केज व मस्साजोग येथे तब्बल १५ तास रास्ता रोको करण्यात आला.

मस्साजोग नजीकच्या पवनचक्की प्रकल्पाच्या ठिकाणी घटने पूर्वी ३ दिवस अगोदर झालेल्या भांडणा मधून संतोषची हत्या झाल्याचे समोर आले. मात्र ही हत्या एवढ्या भयानक पद्धतीने झाल्याने समाज माध्यमावर आलेल्या फोटो मुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळू लागला. बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींसह राज्य भरातून लोक संतोष च्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी मस्साजोग कडे धाव घेऊ लागले. या घटनेतील गुन्हेगार हे आ धनंजय मुंडे यांचे कार्यकर्ते असल्याचे समोर आल्याने हे वातावरण आणखी संतप्त होऊ लागले आणि यातूनच घटनेच्या निषेधार्थ आज सकल मराठा समाजाच्या वतीने बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या बंद मध्ये अंबाजोगाईतील सर्व व्यापारी वर्गाने उत्स्फूर्त पणे सहभाग नोंदवून आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत.

महेश अर्बन को.ऑप.बँकेच्या अध्यक्षपदी ओमप्रकाश सारडा यांची बिनविरोध निवड

परळी (प्रतिनिधी)

येथील महेश अर्बन को.ऑप.बँकेच्या अध्यक्षपदी ओमप्रकाश सारडा यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.बँकेचे मुख्य मार्गदर्शक व प्रवर्तक प्रा.टी.पी.मुंडे सर, उपाध्यक्ष जनार्धन गाडे, संचालक शिवरत्न मुंडे, कृष्णा लोंढे, प्रा.विजय मुंडे, आत्माराम कराड, मिराताई ढवळे, शोभाताई काकडे, प्रभाकर गवळी, संदिप टाक, भिसाराम राठोड आदींच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि.१३/१२/२०२४ रोजी संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी निवडणूक अधिकारी एस.एन.कुलकर्णी, सहाय्यक निबंधक संतोष भंडारी यांनी काम पाहिले. सुचक म्हणून प्रा.टी.पी.मुंडे सर हे होते तर अनुमोदक जनार्धन गाडे यांनी केले. बँकेच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात ही बैठक संपन्न झाली. अध्यक्षपदासाठी केवळ एक अर्ज आल्याने ओमप्रकाश सारडा यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.ओमप्रकाश सारडा यांनी १९९९ ते २००४ या काळात नगरसेवक व बांधकाम सभापती म्हणूनही परळी पालिकेचे काम केले आहे. माहेश्वरी सभेमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असतो. बालाजी मंदिर, बाबारामदेव मंदिरचे संचालक म्हणूनही काम पाहत आहेत. तसेच घाटनांदूर येथील गुरुदास सेवा आश्रम ट्रस्टचे ते संचालक आहेत.श्री सारडा यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी के.एम.उपाध्याय, सर्व कर्मचारीवृंद आदींनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले आहे.

संतोष देशमुखच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या,खा.बजरंग सोनवणे म्हणाले मास्टरमाईंड सुटता कामा नये

संतोष देशमुख कुटुंबाच्या भेटीत खा.बजरंग सोनवणे गहिवरले

केज/प्रतिनिधी

मस्साजोग येथील तरुण सरपंचाचे अपहरण करुन त्यांना टॉर्चर करीत अमानवीय हत्या घडवून आणली आहे.त्यामुळे या घटनेतील मास्टरमाईंडचा शोध लावून सर्वांना कठोर शिक्षा व्हावी.ज्या कारणा साठी हत्या करण्यात आली त्या खंडणी प्रकरणातील सर्वच आरोपींना १५ डिसेंबर पर्यंत अटक करण्यात यावी अन्यथा जनतेचा आक्रोश आटोक्यात ठेवणे अशक्य होईल असा स्पष्ट इशारा खा. बजरंग सोनवणे यांनी दिला.दरम्यान खा. बजरंग सोनवणे यांनी दिल्लीहून येताच शुक्रवार दि.१३ डिसेंबर रोजी सकाळी पोलीसअधीक्षक यांची भेट घेतली.त्यानंतर त्यांनी मस्साजोग येथे स्व. संतोष देशमुख यांच्या परिवाराची सांत्वनपर भेट घेऊन आदरांजली वाहिली.

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने त्यांचे कुटुंबउघड्या वर आले आहे.एक तरुण उमदा माणूस अतिशय अमानवीय पद्धतीने जिवंतपणे मारला गेला आहे.त्यामुळे केजपोलिस ठाण्यात या प्रकरणाचे तपास अधिकारी,पोलीस उपअधीक्षक कमलेश मीना यांची भेट घेऊन पोलिसांच्या हलगर्जी पणाचा जाब विचारत सर्व आरोपींना अटक करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

बीड जिल्ह्यात याअमानुष घटनेच्या निषेधार्थ शांतता पूर्ण बंद पाळण्यात आला आहे.जिल्ह्यात प्रचंड संताप व्यक्त होत असून पोलिस प्रशासनाने त्वरित पावले उचलून दोषींवर कारवाई केली नाही तर याचा उद्रेकहोईल.यासाठी प्रशासनाने तत्काळ न्याय देण्याची भूमिका घ्यावी केज पोलिसांनी वेळीच पावले उचलली असती तर संतोष देशमुख यांचा जीव गेला नसता त्यामुळे यानंतर तपास कसलाही हलगर्जीपणा पोलिसांनी करता कामा नये असे

खडेबोल खा.बजरंग सोनवणे यांनी सुनावले. जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा होत नाही तोपर्यंत आपण शांत बसणार नाही.अशी भूमिका त्यांनी यावेळी स्पष्टपणे बोलून दाखवली.

महाराष्ट्र सिकलकर सिख संघटणेच्या महाराष्ट्र संघटकपदी कंकरसिंह टाका याची निवड

पाटोदा (प्रतिनिधी)

सिकलकर सिख समाज हा महाराष्ट्र राज्याल मोठ्या संखेने असुन ग्रामीण भागात अल्पसंख्यक समाज म्हणुन ओळखला जातो हा समाज इतर समाजाच्या तुलनेत भरपूर मागासलेला आहे. बऱ्याच जागेवर हा समाज अतिक्रमण करुण रहात असल्याणे शासनाची सवलती व सुविधा पासुन वंचित राहत असल्याचे दिसुन येत आहे हा समाज शिक्षणापासून वंचित असल्यामुळे मोलमजूरी करुण अपला उदारनिर्वाह करतो या समाजाची सध्याची परिस्थिती बिकट आहे त्यांच्या जातीय लोखड़ी कमावर बंदी असल्यामुळे उदरनिर्वाह व मुलांचे सिक्षण होने अवघड़ झाले आहे. शासना कडून सवलती व पहिजे ते प्रमाण पत्र मिलत नहीं त्या करनाने त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास खुटला आहे.

करीता महाराष्ट्र प्रदेश संघटना ची अवशकता असल्याने प्रथमच महाराष्ट्र राज्याती सर्व समाज बांधवानी महाराष्ट्र सिकलकर सिख संगटणा दि ०७/१२/२४ रोजी लातूर येथे बैठक घेऊन स्थापित केली असुन महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश अध्यक्ष पदी तेगासिंह बावरी हुजूर साहिब नांदेड़ व महाराष्ट्र राज्य संघटक म्हणुन कंकरसिंह टाक याची निवड करण्यात आली आहे व उपअध्यक्ष बच्चन सिंह कालानी सुरजीत पटवा गुरु चरण सिंह बावरी, सचिव गुरुदयाल सिंह जूनी,सहसचिव झेल सिंह बावरी ,कोषाअध्यक्ष.. गुलज़ित सिंह जूनी यांची निवड करण्यात आली आहे. सर्व नव निर्वाचित मान्येवरांच स्वगत करण्यत आले आहे या बैठकीला महाराष्ट्र राज्यातील शिकलकर सिख समाज बांधव उपस्थित होते.

हेल्थ केअर क्लिनिकच्या वतीने १५ डिसेंबर रोजी मोफत बी.पी. व शुगर तपासणी

शिबिराचे आयोजन

परळी (प्रतिनिधी)

येथील हेल्थ केअर क्लिनिक व जि प. पेन्शनर्स कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी परळी शहरात भव्य मोफत बी पी. व शुगर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील आयसीआयसीआय बँकेच्या बाजूला असलेल्या हेल्थ केअर क्लिनिक्स रुग्णालयासमोर १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत हे तपासणी शिबिर संपन्न होणार आहे. या शिबिरास प्रमुख उपस्थिती दिव्यांग मंत्रालय मुंबईचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, डॉ. संदीप मंत्री, फिजिशियन अँड सर्जन मुंबई येथील व हेल्थ केअर क्लिनिकचे संचालक डॉ. विनय कराड, बीड जिल्हा पेन्शनर शिक्षक कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाबुराव नागरगोजे, व्ही एन. गुट्टे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या शिबिराचा परळी तालुक्यातील गरजवंतांनी आणि नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन ए .तु.कराड व सम्राट गायकवाड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८ ८१ ८८ १९ १३ तसेच ८६ २४ ०२०३२४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

बीड: येथील सेवानिवृत्त मंडळ अधिकारी रामनाथ शेळके यांच्या परिवारांच्या वतीने सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी एम.बी.कांबळे यांचा सत्कार करण्यात आला.

बीड ।प्रतिनिधी

परभणी येतील संविधानाची विटंबना करण्यात आली यांचा निषेध करण्यासाठी संविधान समर्थकांनी लोकशाही मार्गाने अंदोलन केले. या आदोलन करणाऱ्या लोकवरती पोलीसांनी अमानुष पणे लाठीचार्ज केला व त्यांना अटक करण्यात आलेली आहे, अमानुष पणे लाठीचार्ज करणाऱ्या पोलीसावर गुन्हे दाखल करून कडक कार्यवाही करावी तसेच आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यावरील गुन्हे मागे घेण्यात यावे व संविधानाची विटंबना करणाऱ्या मांगील सुत्रधारला तात्काळ अटक करावी, असे निवदेन डॉ. बाबासाहेब आंबेडकर डॉयर्स सोशल फोरम, बीड वतीने देण्यात आली. यावेळी फोरमचे अध्यक्ष – ऍड.राहुल साळवे, ऍड . सदानंद वाघमारे ऍड.धीरजकुमार कांबळे,ऍड. गौतम कडेकर, ऍड. सुनील वडमारे, ऍड. अशोक वाघमारे, ऍड. रामानद कोरडे, ऍड. सत्यनारायन ढा का आदींनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र, यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.

वडवणी।प्रतिनिधी

जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावर राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे त्यांच्यावरील खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत यासाठी वडवणी तहसीलदारांना दिले निवेदन. याबाबत सविस्तर माहिती अशी की,बीड जिल्ह्यात वाढत्या लोकप्रियतेमुळे जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावरील जातीय राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे त्यांच्यावरील खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अन्यथा खोट्या गुन्ह्याच्या निषेधार्थ उद्या शनिवार दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी वडवणी बंद ची हाक देण्यात आली आहे.या निषेध रॅली ची सुरुवात चाटे चौक वडवणी येथून सकाळी १०:०० वाजता सुरू होईल ते ११:३० वाजता वडवणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रॅली समाप्त होईल. यावेळी वडवणी नगरपंचायतचे माजी नगरसेवक सतीश बप्पा बडे तसेच युवा नेते संजय भाऊ आंधळे,भास्कर मुंडे,गोरख पवार,रमेश काका मुंडे,उत्तरेश्वर कागणे आदींनी वडवणी तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला आहे.

५२ वे तालुकास्तरीय विज्ञान, गणित पर्यावरण प्रदर्शनामध्ये एकलव्य विद्यालय शिरूर कासारचा प्रथम क्रमांक

शिरूर कासार/ मनोज परदेशी

५२ वे तालुकास्तरीय विज्ञान,गणित पर्यावरण प्रदर्शन जिल्हा परिषद माध्यमिक शाळा खोकरमोहा येथे पार पडले यामध्ये उच्च प्राथमिक गटात एकलव्य विद्यालयातील विद्यार्थिनी संस्कृती कांबळे आणि प्रतीक्षा घायाळ यांनी प्रथम क्रमांक पटकवला तसेच अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य उच्च प्राथमिक गटात एकलव्य विद्यालयाच्या शिक्षिका आयेशा पठाण मॅडम यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

विज्ञान प्रदर्शनाच्या वेळेस तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी विज्ञान रंजन परीक्षा आयोजित केली होती या परीक्षेमध्ये उच्च प्राथमिक गटात तेजस्विनी खेडकर या विद्यार्थिनी ने द्वितीय क्रमांक पटकवला. एकलव्य विद्यालयाच्या या यशाबद्दल पंचायत समिती शिरूर कासार चे

गटशिक्षणाधिकारी जमीर सर, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रशांत शिंदे सर, सर्व केंद्रप्रमुख मुख्याध्यापक, खोकरमोहा गावचे सरपंच श्रीहरी मिसाळ, एकलव्य विद्यालयाचे मार्गदर्शक प्रा. सचिन सानप सर, प्राचार्य निलेश पोकळे सर, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.